# सादीच्या गोष्टी

लेखक
द. ग. प्रधान



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल.वा.
दा. क्र. २/०८.

IRBK-0103806

किंमत
तीन आणे

अ. २९२०६
बा. वा.
९३४८
३१-३-६७




# सादीच्या गोष्टी

लेखक

द. ग. प्रधान

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा. क्र. 3606 नों. वि. ...............
वि. ...बा. वा.... क्र. ...............

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव: मुंबई

IRBK-0103806

प्रथमावृत्ति : १९४०
पुनर्मुद्रण: १९४४, १९५१

शेखसादी हे इराणांतील प्रसिद्ध कवि होते. त्यांची गणना साधुसंतांच्या मालिकेंत होते. त्यांनीं आमरण आपल्या लिखाणांत नीति, सुविचार, व्यवहार-निपुणता, इत्यादि गुणांचा बहुमोल उपदेश केला.

शेखसादींनीं 'गुलिस्ता' व 'बोस्ता' हे दोन कथात्मक ग्रंथ लिहून आपल्या शिक्षणाचें व अनुभवाचें सार त्यांत ओतलें.

आपल्याकडील तुलसीदासांच्या रामायणाप्रमाणेंच ते तिकडील आबालवृद्धांस प्रिय आहेत.

सुबोध, साधी, हृदयाची पकड घेणारी भाषा व सूचकता हा त्यांच्या ग्रंथांतील विशेष आहे.

आपल्याकडे 'पंचतंत्र', 'इसापनीति', 'हितोपदेश', इत्यादि कथा प्रसिद्ध आहेत, पण त्या पशुपक्ष्यांवर रूपकात्मक तऱ्हेनें रेखाटल्या आहेत. सादीनें आपल्या गोष्टी अनुभवाच्या कुंचल्यानें चितारल्यामुळें त्या मनोरम वठल्या आहेत.

'शेख मुसलउद्दीन', उपनांव 'सादी'–ह्यांचा जन्म सन ११७२ मध्यें इराणांत 'शिराज' शहरीं झाला. शेखसादींचे वडील 'अबदुल्लाह' हे त्या वेळच्या साहबीन जंग राजाच्या पदरीं होते. त्यांना तेथें मोठा मानमरातब होता. ते धार्मिक वृत्तीचे असल्यामुळें, त्यांनीं आपल्या मुलाच्या धार्मिक शिक्षणावरच जास्त भर दिला. पुढें उच्च शिक्षणाकरितां त्यांनीं सादीला 'बगदाद' येथील विश्वविद्यालयांत ठेविलें. सादीनें तेथें पूर्ण अध्ययन करून 'अल्लामा' ही उच्च पदवी मिळविली. सादींनीं बहुतेक आयुष्य प्रवासी वृत्तींतच घालविलें. त्यांनीं पायींच जगभर प्रवास केला. आपल्या आयुष्यांत निरनिराळीं सुखदुःखें त्यांनीं अनुभविलीं होतीं. त्यामुळें त्यांचा जीव उबगून जाऊन, आयुष्याचे अखेरचे दिवस ते शिराज येथील नदीतीरीं एकान्तवासांत कंठूं लागले. सन १२८८ च्या सुमारास त्यांचा अंत झाला.

त्यांची राहाणी साधी व वृत्ती अल्पसंतोषी होती, हें त्यांच्या आयुष्यांतील खालील दोन अनुभवांवरून




सादीच्या
गोष्टी
२

दिसून येईल. एकदां प्रवासांत त्यांना चोरांनीं गांठलें. त्यांच्याजवळ अंगावरील वस्त्रें व कुराण ह्यांखेरीज कांहींसुद्धां नव्हतें. ' हें एवढेंच मजजवळ आहे; त्यांपैकीं वस्त्रें गरिबाला देऊन व कुराण विद्यार्थ्याला देऊन चोरीचा सद्व्यय करा!" असा त्यांनीं चोरांना सल्ला दिला! चोर मनांत खजिल झाले व ते त्यांचे रक्षणकर्ते बनले. तसेंच एकदां सादी अनवाणी पायींच चालत असतां, त्यांच्या मनांत आपल्या आर्थिक परिस्थितीविषयीं विचार येऊन त्यांचें मन खिन्न झालें. तशाच विकल मनःस्थितींत ते माशिदींत आले. तेथें द्वाराजवळ एक मनुष्य बसला होता. त्याला दोन्ही पाय नव्हते. त्यांना अतिशय कळवळा आला. त्यांनीं ईश्वराची अनन्यभावें प्रार्थना करून म्हटलें, "मजजवळ धन नाहीं; पण ईश्वरानें दयाळू होऊन मला निदान पायांपासून तरी वंचित केलें नाहीं!"

सादींच्या 'गझलां'त त्यांच्या काव्यांतील ओज, भावनिपुणता व अर्थवाहक शब्दयोजना, इत्यादि गुणांचा विकास दिसून येतो.

★

# गुलिस्ता

१

एका अत्याचारी राजानें एका साधूला विचारलें, "माझ्यासाठीं कोणती उपासना उत्तम आहे?" त्यावर साधूनें उत्तर दिलें, "आपण दोन प्रहरपर्यंत निवान्तपणें झोंपत जा! हाच आपल्याकरितां उपासनेचा उत्तम मार्ग आहे! म्हणजे निदान त्या अवधींत तरी आपलेकडून कोणास उपद्रव होण्याचा संभव नाहीं!"

★

२

एक दिवस खलिफा हारून अलरशीदचा एक राजपुत्र आपल्या पित्याजवळ येऊन रागानें म्हणाला, "मला एका शिपायाच्या मुलानें शिवी दिली." राजानें मंत्र्यांना विचारणा केली, "काय करावयास हवें?"

कुणीं म्हटलें, "त्या मुलाला कैद करून आणा!"

कुणीं म्हटलें, "त्याला जीवें मारा!"

त्यावर राजा राजपुत्राकडे पाहून म्हणाला, "बेटा! सर्वांत चांगली गोष्ट ही कीं तूं त्याला क्षमा कर! आणि जर तुझ्या अंतःकरणांत इतकी उदारता नसेल तर तूंही त्याला उलट शिवी दे!"

★

३

एकदां एक साधु संसारापासून विरक्त होऊन वनांत राहूं लागला. त्या बाजूनें एकदां राजाची

स्वारी जाऊं लागली. पण त्या साधूनें तिकडे अगदीं दुर्लक्ष केलें! तेव्हां मंत्री त्याच्याजवळ

येऊन म्हणाला, "साधूजी! राजाची स्वारी आपल्या बाजूनें गेली; पण आपणांकडून सन्मानार्थ कांहींच झालें नाहीं!"

साधु म्हणाला, "भगवन्! राजाला सांगा कीं नमस्कारचमत्काराची आशा



त्याला, कीं ज्याला कांहीं मिळविण्याची अपेक्षा असते! दुसरें हें कीं राजा हा प्रजेच्या रक्षणाकरितां आहे; प्रजा मात्र राजाच्या नमस्काराकरितां नाहीं!"

★

४

एकदां न्यायशील नौशेरखां जंगलांत शिकारीसाठीं गेला. तेथें जेवणाकरितां त्याला मिठाची आवश्यकता भासली. त्यानें मनुष्य पाठवून मीठ विकत आणावयास सांगितलें. पण फुकट मीठ घेऊन येशील तर गांव उजाड होईल असें बजावलें. नोकर स्तिमितपणें म्हणाला, "सरकार! थोडेंसें मीठ फुकट आणलें तर गांव कसें उजाड होईल?" नौशेरखां हसत म्हणाला, "जर राजानें प्रजेच्या बगीच्यांतील एक फळ तोडलें, तर त्याचे नोकर लोक त्या झाडाचीं पाळेंमुळें सुद्धां खणून खातील!"

★

५

एक पहिलवान आपल्या शिष्यावर सर्वांत जास्त प्रीति करीत होता. त्यानें आपल्या शिष्यास एका पेंचाशिवाय बाकीचे सर्व कुस्तीचे पेंच शिकविले. त्यामुळें त्या शिष्यास अतिशय गर्व वाटूं लागला. त्यानें राजाजवळ जाऊन म्हटलें, "सरकार! आतां माझे गुरुजी केवळ नांवाचेच गुरु आहेत! मल्लयुद्धांत आतां ते माझ्याशीं सामना करूं शकणार नाहींत! मी मात्र आतां मल्लविद्येंत निष्णात झालों आहें!"


राजानें त्या गर्विष्ठ शिष्याचा गर्व उतरविण्याचा निश्चय केला. दुसरे दिवशीं राजानें राज्यांत दवंडी पिटवून, गुरु–शिष्यांचा कुस्तीचा सामना असल्याचें जाहीर केलें व जिंकणारास मोठें बक्षीस ठेविलें.

हजारों लोक तो सामना पाहावयास जमले.

शिष्यानें गुरूचे सर्व पेंच उलट-पेंच टाकून सोडविले. तेव्हां शेवटीं गुरूनें शिष्याला न शिकविलेला पेंच टाकला. तो अवघड पेंच शिष्यास सोडवितां आला नाहीं! तो अगदीं थकून गेला व हरला!

राजानें गुरूची तारीफ करून त्याला बक्षीस दिलें व शिष्याचा धिक्कार केला.

शिष्य म्हणाला, "सरकार! माझ्या गुरूनें एवढाच पेंच मला न शिकविल्यामुळें मी आज हरलों!" गुरु हसून म्हणाला, "ह्याच



दिवसाकरितां मी तो पेंच तुला शिकविला नव्हता." अशी म्हण आहे कीं मित्रांना इतके सबळ होऊं देऊं नका कीं जे तुमचे शत्रू बनून तुम्हांलाच गोत्यांत आणतील!

६

एका राजानें एका ईश्वरभक्ताला विचारलें, "तुम्ही माझी कधीं आठवण काढीत असतां का?" त्यानें उत्तर दिलें, "होय! जेव्हां मी ईश्वराला विसरतों तेव्हां मला तुमची आठवण होते!"

★

७

एका राजानें आपल्यावरील संकट टळल्यास मी दानधर्म करीन असा नवस केला. त्याच्यावरील संकट टळलें तेव्हां त्यानें साधु-संतांना दानधर्म करण्याकरितां, मोहोरांनीं भरलेली एक थैली आपल्या नोकराजवळ दिली.

संध्याकाळीं तो नोकर ती भरलेली थैली तशीच घेऊन परत आला. राजानें त्याबाबत पृच्छा केली. तेव्हां तो नम्रपणें म्हणाला,

"सरकार! मीं खूप तपास केला; पण मोहोरा घेणारा सत्पुरुष मला आढळला नाहीं! जे खरे सत्पुरुष आहेत ते धनास स्पर्श करीत नाहींत व जे मायासक्त आहेत त्यांना मीं धन दिलें नाहीं!"

★

८

एक साधू एका राजाचा अतिथी होता.

जेव्हां जेवणाची वेळ आली तेव्हां त्यानें अगदीं थोडें भोजन केलें आणि जेव्हां नमाज पढण्याची वेळ आली तेव्हां खूप उशीर लावला. अशासाठीं कीं राजाच्या मनांत आपलेविषयीं श्रद्धा उत्पन्न व्हावी.

ज्या वेळीं तो साधू आपल्या घरीं परत आला, त्या वेळीं त्याच्या पोटांत कावळे कोकलूं लागले! त्यानें आपल्या मुलास वाढण्यास सांगितलें.

पुत्राला आश्चर्य वाटून त्यानें पित्याला विचारणा केली. साधू म्हणाला, "बेटा! राजाचा माझ्या साधुत्वावर अढळ विश्वास राहावा म्हणून तेथील सुग्रास अन्न देखील मीं अगदीं थोडेंसें खाल्लें!"

मुलगा म्हणाला, "पिताजी! आपण पोटभर जेवा; नंतर पुन्हा नमाज पढा! ज्याप्रमाणें अन्न न खाल्ल्यामुळें मनाची तृप्ति झाली नाहीं, तसाच नमाजही ईश्वराच्या ठिकाणीं रुजू झाला नाहीं!"

★

९

लोकांनीं एके दिवशीं हातीम ताईला विचारलें, "तुमच्यापेक्षां अधिक योग्य पुरुष ह्या जगांत तुम्हीं पाहिला आहे काय?" त्यानें उत्तर दिलें, "होय! एक दिवस मीं सर्व गांवास मोठी मेजवानी दिली होती. त्याच दिवशीं मला कांहीं कामाकरितां बाजूच्या खेड्यांत जावें लागलें. वाटेंत एका जंगलामध्यें एक लाकूडतोड्या उन्हांत लाकडाची मोळी घेऊन येत होता. मीं त्याच्याजवळ जाऊन विचारलें, "अरे! तूं आज त्या हातीमचा पाहुणा कां बनत नाहींस? आज सर्व गांवचे लोक त्याचे पाहुणे आहेत!"

त्यावर मोळीविक्या म्हणाला, "जो आपल्या कष्टानें मिळवून भाकरी खातो आहे, तो त्या हातीमासमोर हात कां पसरील!"

★

१०

एकदां तारुण्यावस्थेंत असतां मी आपल्या आईला कठोर तऱ्हेनें बोललों. आई दुःखी अंतःकरणानें एका कोपऱ्यांत जाऊन रडत बसली व रडत रडत म्हणाली, "बाळ! तूं

लहानपण विसरलास म्हणूनच असलें कठोर वाक्ताडन तूं मला केलंस!"

★

११

एका राजानें आपल्या मुलास शिकविण्याकरितां विद्वान शिक्षक ठेविला. तो त्याला खूप रागें भरे. वेळ पडल्यास मार देण्यासही चुकत नसे.

एक दिवस राजपुत्रानें आपल्या पित्याजवळ गुरूची कागाळी केली. राजाला राग आला. त्यानें शिक्षकाला बोलावून आपल्या मुलालाच इतकें कां बोलतां व ताडन करतां आणि इतर मुलांना कां विशेष बोलत नाहीं, ह्याबद्दल जाब विचारला.

शिक्षक म्हणाला, "महाराज! राजपुत्रामध्यें नम्रता व सदाचार ह्यांची जास्त आवश्यकता आहे. कारण राजे लोक ज्याप्रमाणें बोलतात व वागतात, त्याप्रमाणें प्रजेच्या मनावर त्यांचा परिणाम होतो. पण ज्याच्या मनावर सदाचरणाचा लहानपणापासून परिणाम होत नाहीं, त्याच्या अंगीं मोठेपणांत चांगले गुण येऊं शकत नाहींत.

ओल्या मातीच्या घड्याला वाटेल तें वळण देतां येतें; पण तेंच सुक्या घड्याला कांहींच करतां येत नाहीं."

★

१२

एकदां मी यात्रेकरूंबरोबर प्रवास करीत होतों. आमच्या यात्रेकरूंत एक बलवान नवयुवक होता. तो आमच्याजवळ आपल्या शक्तीची घमेंड मारी. एक दिवस आम्हांला चोरांनीं चोहोंकडून घेरलें! तेव्हां मीं त्या

युवकास म्हटलें, "दाखवा आतां आपल्या शक्तीचा प्रभाव!"

त्या युवकाचें तोंड उतरून गेलें! तो गर्भगळित झाला व थरथर कांपूं लागला. त्याची ही स्थिति पाहून मग आम्हीं कसा तरी जीव बचावण्याकरितां पलायन केलें. ज्याला युद्धाचा अनुभव आहे, तोच समरांगणामध्यें टिकाव धरूं शकतो. नुसत्या शक्तीपेक्षां साहसाची अधिक आवश्यकता असते.

★



१३

मी दश्मिमध्यें असतां एका फकिराच्या कबरेजवळील चौथऱ्यावर बसलों होतों. इतक्यांत तेथें अरबदेशाचा बादशहा नमाज पढावयास आला. नमाज पढल्यानंतर तो मला म्हणाला, "मला अलीकडे एका बलाढ्य शत्रूपासून फ़ार उपद्रव होत आहे, तर आपण कृपा करून माझ्याबद्दल ईश्वरापाशीं आशीर्वाद मागा!"

मीं म्हटलें, "शत्रूच्या पंजापासून वांचण्याचा सर्वांत उत्तम उपाय म्हणजे आपल्या दीन प्रजेशीं आपण सदय अंतःकरणानें वागा!"

★

१४

मी दयारेबक येथें एका वृद्ध धनवान मनुष्याचा पाहुणा होतों. त्याला एक रूपगुण-संपन्न मुलगा होता. एक दिवस तो वृद्ध माझ्याकडे पाहून म्हणाला, "हा एवढाच मला एकुलता एक पुत्र आहे. येथून जवळच एक पवित्र वृक्ष आहे. तो नवसास पावतो अशी त्याची ख्याती आहे. मी रात्र रात्र जागून मनोभावें ईश्वराची प्रार्थना केली, तेव्हां कोठें मला पुत्रलाभ झाला." त्याच वेळीं त्याचा पुत्र आपल्या मित्राजवळ कुजबुजत होता, "जर मला त्या वृक्षाचा पत्ता लागेल तर त्या वृक्षाजवळ मी पित्याच्या मृत्यूची प्रार्थना करीन!"

★

१५

एका मनुष्याला वाण्याचें बरेंचसें कर्ज झालें. तो रोज येऊन त्याबद्दल तगादा करी आणि त्याबद्दल कठोर बोलणें बोले. तो बिचारा

निमुटपणें तें बोलणें सहन करी. त्याला त्याशिवाय उपाय नव्हता. एक सुज्ञ मनुष्य तें पाहून त्या मनुष्यास म्हणाला, "आपल्या इच्छा दाबणें इतकें कठीण नाहीं, कीं वाण्याचे वाग्बाण सहन करणें जितकें कठीण आहे! खाटकाचा तगादा सहन करण्यापेक्षां मांसाची अभिलाषा न करणें हें अधिक चांगलें नाहीं का?"

★

## बोस्ता

१

उमर नांवाच्या बादशहाजवळ एक बहुमूल्य अंगठी होती. मोठमोठे रत्नपारखी ती अंगठी पाहून चकित होत. तिचा खडा अंधाऱ्या रात्रीं ताऱ्याप्रमाणें चमके.

एकदा त्या राजाच्या देशांत दुष्काळ पडला. त्या वेळीं राजानें ती बहुमूल्य अंगठी विकून कांहीं दिवस दुष्काळानें गांजलेल्या, भुकेनें व्याकुळ झालेल्या आपल्या दीन प्रजेला अन्नवस्त्र देऊन परिपालन केलें. त्या वेळीं त्याच्या हितचिंतकांनीं सांगितलें कीं ही अशी बहुमूल्य अंगठी एकदां विकल्यावर पुन्हा हातीं येणार नाहीं.

उमर म्हणाला, "ज्या राजाची प्रजा दुःखानें गांजली आहे, त्याला ही असली बहुमूल्य अंगठी शोभा देत नाहीं! प्रजा एका दाण्याकरितां रंजीस आली असतां राजाला रत्नजडित भूषणें शोभायमान होतील काय?"

★


२

दमिस्क येथें एकदां भयंकर दुष्काळ पडला. नद्या, तलाव, विहिरी, सर्व आटून गेल्या. पाण्याचा एक बिंदु सुद्धां राहिला नाहीं! जर तें कुठें असलेंच तर गरिबांच्या डोळ्यांत होतें! जर कुठें कुणाच्या घरांत धूर निघत असलाच तर तो चुलीचा नसून कुणा गरीब विधवेच्या सर्वस्वाची होळी झाल्याचा होता!

त्या वेळीं एका धनवान मित्राला खिन्नपणें बसलेला पाहून मीं पृच्छा केली, “ तुम्ही तर चांगले श्रीमंत आहांत, मग तुमची अशी दशा कां?” माझे शब्द ऐकतांच त्याच्या डोळ्यांत पाणी तरळूं लागलें. तो सद्गदित कंठानें म्हणाला, “ माझी ही दशा स्वतःच्या दुःखानें झाली नसून दुसऱ्याच्या दुःखानें झाली आहे! गरिबांना अन्नपाण्यावांचून तडफडतांना पाहून माझें हृदय दुभंगत आहे! जो मनुष्य आपल्या देशबांधवांच्या दुःखानें व्यथित होत नाहीं, तो मनुष्य पशूपेक्षां सुद्धां नीच आहे!”

★

३



एक दुष्ट शिपाई एकदां विहिरींत पडला. सर्व रात्र तो सारखा रडून रडून मदतीकरितां हांका मारीत होता. तेथें एक मनुष्य आला. त्यानें उलट त्याच्या मस्तकावर एक मोठा थोरला दगड टाकीत म्हटलें, “ दुष्टा! आजपर्यंत कधीं तूं कुणाला दया दाखविली आहेस. तर तूं आज दुसऱ्यापासून दयेची

अपेक्षा करावी! जेव्हां हजारों जणांचीं अंतःकरणें तुझ्या अन्यायानें तडफडत आहेत, अशा वेळीं कोण तुझ्याविषयीं दयार्द्र बुद्धि ठेवील!

"काटे पेरून फुलांची अपेक्षा कां करतोस?"

★

४

एके समयीं यमनमध्यें एक मोठा दानशूर राजा होता. तो धनाला तृणवत् समजे! मेघांतून ज्याप्रमाणें जलधारांचा वर्षाव होतो, त्याप्रमाणें त्याच्या हातून धनाचा वर्षाव होत असे. हातीमचें नांव त्याच्या समोर काढलें कीं त्या राजाला मोठा राग येई! एकदां त्यानें एका आनंदोत्सवाला पुष्कळ लोकांना निमंत्रण दिलें. सहज बोलतां बोलतां कुणी हातीमच्या दिलदारपणाची गोष्ट काढली.

त्याबरोबर राजाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तात्काळ त्यानें दूतास आज्ञा केली कीं हातीमचें शिर कापून घेऊन ये! तो मनुष्य हातीमचा शोध करण्याकरितां निघाला. कांहीं दिवसांनंतर रस्त्यांत त्याची व एका युवकाची गांठ पडली. तो युवक अति गुणवान व शीलवान होता. त्यानें त्या मनुष्यास आपल्या घरीं नेऊन त्याचा मोठा आदरसत्कार केला.

दुसऱ्या दिवशीं त्या घातकी मनुष्यानें जाण्याबाबत परवानगी मागितली. तेव्हां त्या युवकानें अत्यंत विनीत भावानें म्हटलें "हें आपलेंच घर आहे! आणखी दोन दिवस राहा!" तो घातकी मनुष्य म्हणाला, "मला सुद्धां वाटत आहे कीं आणखी दोन दिवस आपल्या संगतीचा लाभ घ्यावा. पण काय

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक
नों.

करूं? मला अत्यंत जरूरीचं काम आहे!" हातीम म्हणाला, "जर कांहीं हरकत नसेल तर मला आपलें काम सांगा! मला कांहीं साहाय्य करतां आलें तर पाहीन!" तो म्हणाला, "यमनच्या बादशहाच्या हुकुमावरून मी हातीमचा



वध करण्यास निघालों आहें. कुणास ठा‍ हातीमबद्दल बादशहाच्या मनांत कां अढी आहे. तुम्ही हातीमाला ओळखत असाल तर कृपा करून त्याचा पत्ता सांगा."

युवक निर्भयतेनें म्हणाला, "तो हातीम मीच! काढ तुझी तलवार अन् कर माझा शिरच्छेद! तूं आपल्या कामांत उगीच दिरंगाई करूं नकोस! माझे प्राण तुझ्या कामीं येताहेत हें पाहून मला फार आनंद होतो!" हे शब्द ऐकतांच तो मनुष्य हातीमच्या पायांवर लोळण घेऊन सजल नेत्रानें सद्गदित कंठानें म्हणाला, "हातीम, तूं खरोखरच दानशूर आहेस! जरी मीं तुझी कीर्ति ऐकली होती, तरी त्यापेक्षां किती

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

तरी पटींनीं अधिक चांगुलपणा तुझ्या ठिकाणीं मला आढळला. माझ्याकडून नुसत्या तोंडानें फुंक मारणें सुद्धां होणार नाहीं. मी तुझा दास आहें व सदैव राहीन." असें म्हणून तो मनुष्य राजाला परत आला.

बादशहानें रिकाम्या हातानें त्याला परत आलेला पाहून त्याची खूप निर्भर्त्सना केली. तेव्हां त्या मनुष्यानें घडलेली सर्व हकीकत राजास सांगितली. राजा चकित होऊन हातीमच्या गुणांची प्रशंसा करीत म्हणाला, "खरोखर तोच खरा दानशूर राजा शोभतो कीं जशी त्याची कीर्ति आहे तसेच अमूल्य गुण त्याचेजवळ आहेत!"

★

५

कोण्या एका भक्तानें स्वप्नांत साधूला नरकवासांत व राजाला स्वर्गांत पाहिलें. त्याला आश्चर्य वाटून त्यानें त्याबाबत आपल्या गुरूला विचारलें. गुरूनें सांगितलें, "राजाला साधुसंतांची आवड होती, त्यामुळें त्याला स्वर्गवास घडला आणि साधूला राजा व श्रीमंत माणसें ह्यांच्या सहवासाची आवड होती म्हणून त्यास नरकवास घडला!"

★

६

कोणी एकानें स्वप्नांत प्रलयलीला पाहिली. एक मोठी यात्रेकरूंची झुंड दुःखानें व त्रासानें किंचाळत होती. पण त्यांतील एक मनुष्य गळ्यांत टपोऱ्या मोत्यांची माळ घालून शीतल छायेंत बसला होता. त्याला विचारल्यावर त्यानें सांगितलें, "एकदां मीं आपल्या दरवाजावर खसतट्टी लावली होती. त्या शीतल

छायेंत एका महात्म्यानें एक दिवस विश्रांति घेतली होती."

★

७

एक सुज्ञ मनुष्य आपल्या पुत्राला वारंवार उपदेश करी कीं धन, संपत्ति ह्या अभिलाषे-ऐवजीं विद्या शीक. संचित केलेलें धन एक वेळ सरून जाईल, पण विद्यारूपी धन कधींच कमी होणार नाहीं! त्यानंतर देशामध्यें राज्यक्रांति होऊन सगळा गोंधळ झाला. नवीन राजानें गादीवर बसल्यावर पूर्वींच्या ऐतखाऊ लोकांना हांकलून दिलें व त्यांच्या इस्टेटी जप्त केल्या आणि नगरांतील बुद्धिमान् व शिकलेल्या लोकांना मोठमोठ्या महत्त्वाच्या जागांवर नेमलें. राजाश्रय गेल्यामुळें मूर्ख मंत्री भीक मागूं लागले!

आपल्या वडिलांजवळून कांहीं संपादन करावयाचें असल्यास त्यांचे गुण अंगीं आणा.

त्यांच्याजवळील पैशाची अपेक्षा करूं नका!

★

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक : बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

म. ग्र. सं. ठाणे, [illegible]
क्र. 3206 नों. दि ..............
वि. ............ क्र. ..............

IRBK-0103806

सादीच्या गोष्टी २०

## बालवाचकांकरितां छान छान गोष्टींचीं पुस्तकें

| | आणे |
|---|---|
| **सुरस गोष्टी**, १-२, मनोहर, | ४॥ |
| **गमतीच्या गोष्टी**, १-४, विठ्ठल कृष्ण नेरूरकर, प्रत्येकीं | ६ |
| **नऊ गोष्टी**, ग. म. वैद्य, | ४ |
| **बारा गोष्टी**, दा. वि. फफे, | ६ |
| **पस्तीस गोष्टी**, | रु. १ |
| **मौजेच्या गोष्टी**, १ ते ३; | ४, ४, ५ |
| **छान गोष्टी**, १ ते ३, मालतीबाई दांडेकर, प्रत्येकीं | ४ |
| **नदीकांठच्या गोष्टी**, का. रा. पालवणकर, | ४ |
| **टेकडीवरच्या गोष्टी**, ,, | ४ |

| | आणे |
|---|---|
| **गच्चीवरच्या गोष्टी**, पालवणकर, | ४ |
| **ऐतिहासिक गोष्टी**, ग. म. वैद्य, | ६ |
| **मनोरंजक गोष्टी**, ,, | |
| **सुलभ वाचनपाठ**, वीरकर, | ४ |
| **शिशुपाठ**, श्रीराम अनंत वीरकर, | ६ |
| **बाल इसापनीति**, १-२, त्र्यंबक पुरुषोत्तम थोरात, प्रत्येकीं | ६ |
| **बाल अरेबियन नाइट्स्**, १-२, ,, | १२ |
| **बालहितोपदेश**, १-२, फफे, प्रत्येकीं | ६ |
| **मधली सुटी**, वि. कृ. नेरूरकर, | ६ |
| **नवलकथा**, १-३, गो. वि. रानडे, | ४, ६, ८ |

| | आणे |
|---|---|
| **उंदीरमामाचें लग्न**, द. के. बर्वे, | ३ |
| **मन्या, बन्या आणि इतर गोष्टी**, म. का. कारखानीस, | ४ |
| **भोळीं माणसें व धूर्त माणसें**, | ६ |
| **कथाकुंज**, बा. रा. प्रभु, | ६ |
| **बिलोरी आरसे**, ना. धों. उपाध्ये, | ६ |
| **एक होती राणी**, वि. वा. जोशी, | ६ |
| **गोष्टींचा तास**, १-४, भा. म. वैद्य, | ३-४-४-६ |
| **बिचारा कोकीळ**, कावेरी कर्वे, | ४ |
| **द्राक्षांचा मळा**, ग. म. वैद्य, | |
| **थोरांच्या गोष्टी**, १ ते ३, | १०-१२-१४ |

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४